सातारा दि.२४/०७/२०२४

# प्रसिध्दीपत्रक

## सातारा पोलीस भरती २०२२-२३

## लेखी चाचणीकरिता येणाऱ्या उमेदवारांकरिता सूचना

सातारा जिल्हा पोलीस भरती २०२२-२३ मधील लेखी चाचणीस पात्र झालेल्या उमेदवारांची **लेखी चाचणी दि.२६/०७/२०२४ रोजी महाराष्ट्र स्कुटर्स लिमिटेड, सी-१, जुनी एम.आय.डी.सी, सातारा ४१५००४** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. लेखी चाचणीस बोलविण्यात आलेल्या उमेदवारांनी खालील दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

- उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर परीक्षा वेळेच्या १ तास पुर्वी उपस्थित रहावे.
- उमेदवारांनी लेखी चाचणीस येताना आपणाकडील असलेले लेखी चाचणीचे हॉल तिकीट सोबत घेवून येणे अनिवार्य आहे.
- लेखी चाचणीस येणाऱ्या उमेदवारांनी ओळखपत्राचा पुरावा म्हणून मुळ आधार कार्ड, पासपोर्ट, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स इ. व नजिकच्या काळातील दोन फोटो सोबत घेवून येणे.
- उमेदवारांनी सोबत आणलेले सर्व साहित्य (बॅग, मोबाईल, मैल्यवान वस्तू इ.) परीक्षा केंद्राबाहेरील गेटवर ठेवण्यात यावे. परंतू त्या वस्तू गहाळ झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ही उमेदवाराची राहिल.
- उमेदवारांना परीक्षाकेंद्रामध्ये तगड व काळया रंगाचा बॉलपेन सातारा पोलीस दलामार्फत पुरविण्यात येणार आहे.
- लेखी चाचणीस येणाऱ्या उमेदवारांना परीक्षा केंद्रामध्ये इलेक्ट्रीक वस्तू, कॅलक्युलेटर, मोबाईल फोन, घडयाळ, ब्लुथूत, रेनकोट, छत्री अथवा इतर कोणत्याही प्रकारच्या वस्तूसह प्रवेश दिला जाणार नाही. अशा प्रकरची कोणतीही वस्तू उमेदवारासोबत आढळून आल्यास अशा उमेदवारांना संपूर्ण भरती प्रक्रियेमधून अपात्र करण्यात येईल तसेच त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल याबाबत दक्षता घ्यावी.
- परीक्षा सुरु झाल्यापासून परीक्षेचा कालावधी पुर्ण होई पर्यंत कोणत्याही उमेदवारास परीक्षा केंद्राच्या बाहेर जाता येणार नाही.
- जे उमेदवार लेखी चाचणीस गैरहजर राहिल्यास कोणत्याही कारणास्तव त्यास पुन्हा संधी दिली जाणार नाही गैरहजर उमेदवारास भरती प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्यात येईल याबाबत दक्षता घ्यावी.
- लेखी चाचणीस येणाऱ्या पुरुष उमेदवारांची पोलीस करमणुक केंद्र, अलंकार हॉल, सातारा व महिला उमेदवारांची शाहु स्टेडीअम, सातारा येथे निवासाची व्यवस्था करण्यात आलेली आहे निवासस्थानाबाबत काही शंका असल्यास उमेदवारांनी सातारा नियंत्रण कक्ष ०२१६२-२३४१३० या क्रमांकावर संपर्क साधावा.

**( समीर शेख )**
**पोलीस अधीक्षक, सातारा.**